# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव

## (महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

जा. क्र. शाअमज / शैवपवि / 449 दि. 04/03/2025

**Notice for all the concerned students regarding carry-on**

**कॅरी-ऑन संदर्भात विद्यार्थ्यांना महत्वपूर्ण सूचना**

**संदर्भ:** शासन आदेश क्र. संकीर्ण-२०२५/ई-९७०२२०/विशि-३ दि. १० फेब्रुवारी, २०२५

सदर संदर्भीय शासन आदेशानुसार **कॅरी-ऑन** संबंधी या संस्थेतील संबंधित विद्यार्थ्यांसाठी खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत *(Hon. Academic Council, Govt. CoE, Jalgaon च्या मान्यतेच्या अधीन राहून)*

१. प्रथम वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाच्या ५ व्या सत्राकरिता तसेच द्वितीय वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना चतुर्थ वर्षाच्या ७ व्या सत्राकरिता तसेच वरील वर्गात प्रवेश देण्याची पात्रता ही सम सत्र 2023-24 (म्हणजे उन्हाळी परीक्षा 2023-24) च्या परीक्षांच्या निकाला ऐवजी विषम सत्र 2024-25 (म्हणजे हिवाळी परीक्षा 2024-25) च्या निकालावर ठरविण्यात येईल.
(स्पष्टीकरण: पुढील वर्षात प्रवेशासाठी लागणारी पात्रता ही संस्थेच्या नियमानुसारच राहील फक्त अशी पात्रता ही Summer-2024 परीक्षेच्या निकाला ऐवजी Winter-2024 च्या निकालावर ठरविण्यात येईल.)
२. अशा प्रकारे पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या विषम व सम सत्राच्या परीक्षा या Summer-2025 सत्राच्या शेवटी घेण्यात येतील.
३. अशा प्रकारे वरील वर्गात पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे विषम सत्राचे अभ्यासक्रम पूर्ण करण्याची जबाबदारी त्या विद्यार्थ्यांची असेल आणि यासाठी विद्यार्थ्यांना या महाविद्यालयाकडे आवश्यक हमीपत्र भरून द्यावे लागेल.
४. सदर सुविधा अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये केवळ शैक्षणिक वर्ष 2024-25 करिताच लागू राहील व या सुविधेचा संदर्भ पुढील वर्षामध्ये घेता येणार नाही.

वरील सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करून त्यानुसार पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले अर्ज, आवश्यक त्या कागदपत्रांसह (मागील सर्व परीक्षांचे ग्रेड-कार्ड तसेच हिवाळी-२०२४ च्या परीक्षेचे संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या R14 reports च्या प्रती) संबंधित विभागप्रमुख यांचे मार्फत दि. 7 मार्च, 2025 पर्यंत Dean-office (Room no. 219) येथे प्रत्यक्ष जमा करावेत. या दिनांकानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
(प्राप्त अर्जांची पडताळणी केली जाईल व वरील अटींची पूर्तता करणाऱ्या विद्यार्थ्यांनाच पुढील वर्गात प्रवेश दिला जाईल याची नोंद घ्यावी.)

(डॉ. श्रीपाद मोहनी)
अधिष्ठाता - शैक्षणिक
शा. अ. म. जळगांव

GOVT. COLLEGE OF ENGINEERING JALGAON

(डॉ. सुहास गाजरे)
प्राचार्य
शा. अ. म. जळगांव

प्रत: सर्व विभाग प्रमुख (सूचना फलकावर लावण्यासाठी), संस्थेचे संकेतस्थळ